ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 10 | July - 2016




Review Of Research

# उच्च प्राथमिक स्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास

नाईकनवरे परमेश्वर अनंता
एच.एस.डी.एड.,बी.ए.बीएड.,एम.ए.एमएड. रिसर्च स्कॉलर, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी,सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

***प्रस्तावना :–***

**१.संशोधन विषयाची पार्श्वभूमी**

समावेशक शिक्षण ही अतिशय महत्त्वपूर्ण संकल्पना असून ती सर्व शिक्षण अभियान कार्यक्रमाचा एक भाग आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळणे हा त्या व्यक्तीचा, बालकाचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे अपंग मुले, व्यक्ती यांना इतरांपेक्षा वेगळे न मानता त्यांनासुद्धा मुख्य शिक्षणप्रवाहात सामील करून घेण्यासाठी सन १९९० मध्ये ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली. सन १९९० च्या जोग्टीन, देश थायलंड येथे शिक्षणावरील जागतिक परिषदेत



सर्वांसाठी शिक्षण (Education for all) हा जाहीरनामा स्वीकारण्यात आला. हा जाहीरनामा शिक्षणक्षेत्रातील ठळक, नवीन दिशादर्शक म्हणून परिभाषित करण्यात आला. 'प्रत्येक व्यक्ती, मूल, तरूण आणि प्रौढ त्यांच्या मूलभूत शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी सक्षम असेल' असे घोषित करण्यात आले.

संशोधक उच्च प्राथमिक स्तरावर गेली पाच वर्षे अध्यापनाचे कार्य करीत आहे. हे अध्यापन करीत असताना संशोधकाला समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये वरील समस्या जाणवल्या. या समस्या इतर शिक्षकांनाही जाणवतात काय? जर जाणवत असतील तर त्या समस्यांची उकल करण्यासाठी शैक्षणिक संशोधनाची मदत होईल का? या विचारातून संशोधक उच्च प्राथमिक स्तरावरील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करणार आहे.

**२. समस्या विधान व महत्त्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या:**

**अ) समस्या विधान**

उच्च प्राथमिक स्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास.

**ब) महत्त्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या**

**१) उच्च प्राथमिक स्तर**

बालकाच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार प्राथमिक शिक्षणाचा आकृतीबंध इयत्ता १ ते ८ वी मधील इयत्ता ६ ते ८ वी पर्यंतचा स्तर.

**२) समावेशक शिक्षण**

संपूर्ण शिक्षण व्यवस्थेद्वारे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजानुसार सर्वसामान्य शिक्षण योजनेत सहभागी करून घेणे म्हणजेच समावेशक शिक्षण होय. समावेशक शिक्षण म्हणजेच मुख्य शिक्षण प्रवाहात सर्वांना सहभागी करून घेणारे शिक्षण.

### ३. संशोधनाची उद्दिष्टे

१) उच्च प्राथमिकस्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना अध्यापन तासिकेचे नियोजन करताना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

२) उच्च प्राथमिक स्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना अध्यापन पद्धतीची निवडी करताना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

३) उच्च प्राथमिक स्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना वर्गपातळीवर नियमित वर्गाध्यापन करताना येणा-या समस्यांचा शोध घेणे.

४) उच्च प्राथमिक स्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना शाळा पातळीवर अतिरिक्त वर्गाध्यापन व इतर कामे करताना येणा-या समस्यांचा शोध घेणे.

५) उच्च प्राथमिक स्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये प्रज्ञावान विद्यार्थी, सर्वसामान्य विद्यार्थी व अपंग विद्यार्थी प्रकारानुसार शैक्षणिक साहित्याची निर्मिती करताना शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

६) उच्च प्राथमिक स्तरातील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करताना शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

७) उच्च प्राथमिक स्तरावरील समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना येणा-या समस्या रोखण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

### ४. संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे आहेत.

१) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इ. १ ली ते ८ वी च्या वर्गामध्ये विशेष गरजाधिष्ठित विद्यार्थी असतात.

२) समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये विशेष गरजाधिष्ठित विद्यार्थ्यांच्या सर्व अपंगत्व प्रकाराची शैक्षणिक साधने सर्व अपंग विद्यार्थ्यांना योग्य वेळी उपलब्ध होत नाहीत.

३) सर्वसामान्य विद्यार्थी व विशेष गरजाधिष्ठित (अपंग, सर्वसामान्य व प्रज्ञावान) विद्यार्थी यांची वर्गातील बैठक व्यवस्था एकत्रित असते.

४) सर्वसामान्य क्षमतेच्या विद्यार्थ्यास अध्यापन करणारे शिक्षकच विशेष गरजाधिष्ठित विद्यार्थ्यांनापण बहुतांश शाळांमध्ये अध्यापन करतात.

५) समावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीत शिक्षकांना अध्यापन, मूल्यमापनविषयक समस्या आहेत.

६) समावेशक शिक्षणात सर्वांसाठी शिक्षण (Education for all) असते.

७) समावेशक शिक्षणात विभिन्न अध्ययनार्थींचा अध्ययनाचा वेग विद्यार्थीपरत्वे वेगवेगळा असतो.

### ५. संशोधनाची कार्यपद्धती

#### अ) संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात सद्यस्थितीचा अभ्यास केला आहे म्हणून वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण प्रकारापैकी शालेय सर्वेक्षणाचा वापर केला आहे.

#### ब) नमुना निवड

**१) शाळेची निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतील महाबळेश्वर विकास गटातील मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक स्तरातील ५७ शाळांपैकी २५ उच्च माध्यमिक शाळांची निवड संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने केली आहे.

**२) शिक्षकांची निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने निवडलेल्या २५ जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत वर्गाध्यापन करणारे प्रत्येकी ३ वर्गशिक्षक याप्रमाणे एकूण ७५ वर्गशिक्षकांची निवड असंभाव्यतेवर आधारित सहेतुक नमुना पद्धतीने केली आहे.

#### क) संशोधनाची साधने व तंत्रे

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

#### ड) संख्याशास्त्रीय साधने

प्रस्तुत संशोधनात संशोधन साधनांद्वारे जमा केलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी मध्यमान, शेकडेवारी या संख्याशास्त्रीय परिमाणांचा विचार केला आहे.

### ६. संशोधनाचे निष्कर्ष

१) नियमितपणे विद्यार्थीकेंद्रीत अध्यापन करण्यासाठी प्रचलित अध्यापन तासिका नियोजन निरर्थक आहे.

२) साप्ताहीक अध्यापन तासिका नियोजनामध्ये, प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी विशेष अध्यापन तासिकांचे नियोजन केले जात नाही.

३) साप्ताहीक अध्यापन तासिका नियोजनामध्ये, CWSN विद्यार्थ्यांसाठी गरजाधिष्ठित अध्यापन तासिकांचे नियोजन केले जात नाही.

४) समावेशक शिक्षणासाठी अध्यापन पद्धतीची निवड करताना विविध समस्या जाणवतात.

५) समावेशक शिक्षणामध्ये अध्यापनासाठी चर्चा पद्धती निवडल्यास व्यक्तिभिन्नता, प्रतिसादशून्य अपंग बालके व विषयांतर होते.

६) समावेशक शिक्षणामध्ये अध्यापनासाठी गटपद्धती निवडल्यास CWSN बालकाचे शाळेत समरस न होणे, कमी पटसंख्या, नेतृत्वगुणाचा अभाव असतो.

७) बुद्धिमंथनाचा समावेशक शिक्षणातील CWSN / अपंग बालकांना फायदा होत नाही.

८) समावेशक शिक्षणामध्ये अध्यापन पद्धतीची अचूक निवड करण्यासाठी अध्यापकांना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण उपलब्ध नाही.
९) समावेशक शिक्षणामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या गरजानुरूप पुरेशी बैठक व्यवस्था - बेंच, कमोड चेअर, रॅम्प, हॅण्ड्रील इत्यादी भौतिक साधने उपलब्ध नाहीत.
१०) वर्गपातळीवर नियमित अध्यापन करण्यासाठी समावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्येएवढी ई-लर्निंग साधने उपलब्ध नाहीत.
११) प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी नियमित वर्गाध्यापन करताना, आशययुक्त संदर्भ पुस्तके, ग्रंथालय, प्रेरणादायक मार्गदर्शन, पडताळासूची, आधुनिक शैक्षणिक साधने यांचा अभाव आहे.
१२) CWSN विद्यार्थ्यांसाठी मिळणाऱ्या लेखन, वाचन सहाय्यक साधनांचा, हालचालविषयक अपंग साधनांचा अभाव आहे, प्राप्त झालेल्या साधनांचा अवेळी पुरवठा व दर्जा निकृष्ट आहे.
१३) नियमित शालेय वर्गाध्यापनामध्ये निवडणूकीची कामे, जनगणना, शालेय पोषण आहार योजनेची कामे, शाळा व वर्गखोल्यांची बांधकामे, स्थानिक परंपरा, यात्रा, उत्सव इत्यादी अशैक्षणिक कामे शिक्षकांवर लादली जात असल्याने शैक्षणिक गुणवत्ता सुधारत नाही.
१४) शालेय वेळेमध्ये अप्रगत विद्यार्थ्यांचे जादा तास वर्गाध्यापन घेतल्यामुळे सर्वसामान्य व हुशार विद्यार्थ्यांवर अन्याय होतो.
१५) समावेश शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांना शाळा पातळीवर अतिरिक्त वर्गाध्यापन करावे लागते.
१६) मुख्याध्यापक, लिपीक पदे उपलब्ध नसल्याने शाळेतील सेवाजेष्ठ शिक्षकांवर कामाचा ताण येतो.
१७) CWSN विद्यार्थ्यांसाठी; स्टेशनरी साहित्य, वेळेची मर्यादा, अपंगाच्या गरजानुरूप शैक्षणिक साधने निर्मिती, ब्रेललिपी, श्रवणयंत्र याविषयीच्या मार्गदर्शनाचा अभाव, खर्चिक प्रक्रिया आदी समस्या शैक्षणिक साहित्य निर्मिती करताना अध्यापकांना जाणवतात.
१८) वयानुरूप दाखल विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती करताना शैक्षणिक मानसशास्त्र, बालस्नेही पद्धती, प्रमाणित भाषेचा वापर, पूर्वज्ञानाचा अभाव यासारख्या समस्या शिक्षकांना भेडसावतात.
१९) उच्च प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करताना मूल्यमापनविषयक समस्या निर्माण होतात.

### ७. शिफारशी

१) नियमितपणे विद्यार्थीकेंद्रीत अध्यापन करण्यासाठी प्रचलित अध्यापन तासिका नियोजनात सुधारणा कराव्यात.
२) साप्ताहीक अध्यापन तासिका नियोजनामध्ये प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी विशेष अध्यापन तासिकांचे नियोजन करावे.
३) साप्ताहीक अध्यापन तासिका नियोजनामध्ये CWSN विद्यार्थ्यांसाठी गरजाधिष्ठित
४) समावेशक शिक्षणासाठी अध्यापन पद्धतीची निवड करताना विद्यार्थी प्रकार लक्षात घेऊन निवड करावी.
५) समावेशक शिक्षणामध्ये गटपद्धतीचा वापर सर्वसामान्य प्रकारातील विद्यार्थ्यांसाठी करावा.
६) सर्व प्रकारातील विद्यार्थी गटासाठी पुरेसा वेळ देऊन वर्गाध्यापन करावे. प्रसंगी शालेय वेळाव्यतिरिक्त जादा अध्यापन तासिका घ्याव्यात.
७) समावेशक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या गरजानुरूप विविध भौतिक साधने शासनाने उपलब्ध करून द्यावीत किंवा संबंधित शाळांना अनुदाने द्यावीत.
८) प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालय प्रवेशाची माहिती व शिफारस शाळेने करावी. तसेच शासनाने प्रज्ञावानासाठी विविध अनुदाने द्यावीत.
९) अप्रगत विद्यार्थ्यांसाठी शालेय वेळेव्यतिरिक्त जादा तासिकाचे नियोजन व कार्यवाही करावी.
१०) दैनिक पाठाचे नियोजन व प्रत्यक्ष वर्गाध्यापन यामध्ये समन्वय साधताना दिनविशेष व शालेय कामकाजाचे पूर्वनियोजन करावे.
११) विद्यार्थीकेंद्रीत अध्यापनाचा वर्गाध्यापनासाठी अवलंब करावा.
१२)संबंधित शाळेतील अध्यापकाला शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीचे आवश्यक प्रशिक्षण द्यावे, शळेतील शिक्षक पदे रिक्त असल्यास त्वरित भरावीत.
१३) उच्च प्राथमिक स्तरातील सर्व शिक्षकांना सर्व शाळेय विषयक अध्यापनाचे पायाभूत प्रशिक्षण द्यावे.
१४) प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी, अध्ययन युक्त्यांसह शब्दकार्डे, संख्याकार्डे, ध्वनिचित्रफित निर्मिती पाठ्यांशानुरूप दृकश्राव्य शैक्षणिक साधने निर्मिती कृतीयुक्त ABL साधने, ई-लर्निंग साधने यासारखी शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्यासाठी उच्च प्राथमिक स्तरातील शिक्षकांच्या दर्जेदार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे.
१५) उच्च प्राथमिक स्तरातील सर्व अध्यापकांना अपंग / CWSN विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक साधने निर्मितीचे प्रशिक्षण द्यावे.
१६) उच्च प्राथमिक स्तरातील शिक्षकांसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन या विषयावर दर्जेदार प्रशिक्षण द्यावे.
१७) CWSN / अपंग विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करण्यासाठी शिक्षकाचे विशेष चर्चासत्र आयोजित करावे.

### संदर्भ ग्रंथसूची -

१. अवचर, सीमा (२०१०). विशेष शिक्षण, पुणे : नित्यनूतन प्रकाशन
२. घोरमोडे, के. यु. व घोरमोडे, कला (२००८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर : विद्या प्रकाशन.
३. लेले, द. ना. (२०१०). एक उपेक्षित व्यंग (कर्णबधिर बालक), पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
४. Menon, Latika (२०१४). Inclusive and Integrated Approaches to Special Education, New Delhi : Kanishka Publishers.
५. Vijayan, Premavathy and Geetha, T. (२०१४). Integrated and Inclusive Education, New Delhi : Kanishka Publishers.



नाईकनवरे परमेश्वर अनंता
एच.एस.डी.एड.,बी.ए.बीएड.,एम.ए.एमएड. रिसर्च स्कॉलर, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी,सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.